# **मुद्रांक परतावा**

## विषय ओळख

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 44 व 47 ते 52 मध्ये मुद्रांक खरेदीदारांनी विकत घेतलेले मुद्रांक वापरण्याचे प्रयोजन रद्द झाले तर किंवा मुद्रांक वापरापूर्वी खराब झाले तर किंवा जादा भरलेल्या मुद्रांकाचा परतावा देण्याची तरतूद आहे.

यासाठी मुद्रांक जेथून खरेदी केले आहेत त्या जिल्हयातील मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे परतावा अर्ज ऑनलाईन करुन प्रत्यक्ष अर्ज आवश्यकत्या कागदपत्रासह विभागाने निश्चित केलेल्या नमुन्यात विहित मुदतीत दाखल करावा.